# महाराष्ट्र शासन

## कृषि विभाग

## कार्यालयः-उप-विभागीय कृषि अधिकारी,बीड.

### ई-निवीदा क्र.(११)/कृषि विभाग/जशिअ २.०/२०२५-२६

उप-विभागीय कृषि अधिकारी,बीड यांच्या वतीने नोंदणीकृत कंत्राटदार यांच्याकडून बी-१ नमुन्यात ई-निवीदा मागविण्यात येत आहेत. निवीदेची सविस्तर माहिती http://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक १३/०५/२०२६ सकाळी ११.०० वाजे पासून ते दिनांक २३/०५/२०२६ सायंकाळी ०५.०० वाजेपर्यन्त उपलब्ध आहे.

**कामाचा तपशील खालील प्रमाणे.**

| अ .क्र . | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय किंमत | १ टक्का इसारा रक्कम | २ टक्का सुरक्षा अनामत रक्कम | काम पुर्ण करण्याचा कालावधी | कोरी निवीदा किम्मत | कंत्राटदाराचा वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | खोल सलग समतल चर गट क्रं -१,२,३ नागरेवाडी ,तालुका शिरूर कासार जिल्हा बीड | १२५४०९४/- | १२५४१/- | २५०८२/- | ३० दिवस | ५९०/- | खुला |
| २ | कंपार्टमेंट बंडीग गट क्रं -१,२,३ लिंबारूई देवी ,तालुका जिल्हा बीड | १८०५३०१/- | १८०५३/- | ३६१०६/- | ३० दिवस | ५९०/- | सुबेअ |

उपविभागीय कृषि अधिकारी
बीड

Scanned with OKEN Scanner

**निविदाधारकांस सुचनाः-**

१) निविदेचा तपशील http://www.mahatenders.gov.in संकेतस्थळावर दिलेला आहे.

२) निविदेतील बी-१ नमुन्यातील सर्व अटी कंत्राटदाराला बंधनकारक राहतील.

३) सदरील काम करतांना कोणत्याही प्रकारचा अग्रीम दिला जाणार नाही.

४) सदरील काम दिलेल्या कालावधीत पुर्ण करणे आवश्यक आहे.

५) कामाचे सर्व साहित्य निविदेतील कामाचे स्थळावर कंत्राटदाराने स्वतः उपलब्ध करून काम करणे आवश्यक आहे.

६) निविदेतील अटी-शर्तीत बदल करण्याचा व तसेच कोणतेही कारण न देता निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार उपविभागीय कृषि अधिकारी,बीड यांनी राखून ठेवलेला आहे.

७) अटी व शर्ती मान्यता प्रमाणपत्र (परिशिष्ट-१),काळ्या यादीत नाव नसल्याचे (परिशिष्ट-२) प्रमाणपत्र अपलोड करावे (स्वाक्षरीसह).

८) या निविदे संबंधी या पुढील सर्व सुचना/शुद्धीपत्रके ऑनलाईन करण्यात येतील.

९) वरील कामाची संपुर्ण माहिती http://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर **दिनांक १३/०५/२०२६.वेळ सकाळी ११:०० वाजेपासून ते दिनांक २३/०५/२०२६. वेळ सायंकाळी ०५:०० वाजेपर्यन्त** पाहता व डाऊनलोड करता येईल.

१०) कंत्राटदाराने सर्व कामे दिवसा करणे आवश्यक आहे.

११) एका कंत्राटदारास उपविभागीय कृषी अधिकारी, बीड कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात त्यांच्या काम करण्याच्या कमाल मर्यादेस (सार्वजनीक बांधकाम विभाग शा.नि.क्र.सीएटी-२००६/प्रक्र-१४१/इमारती-२ दिनांक ०६-०२-२००७ नुसार) अधीन राहुन जास्तीत जास्त रू.५०.०० लाखाच्या निवीदा भरता येतील.

१२) निविदा फिस व बयाणा रक्कम ऑनलाईन नेटबॅकींगद्वारे अदा करावी व सोबत पावती अपलोड करावी.

१३) परिपत्रक जा.क्र.मृदस/मृद-६/ई-निवीदा/३१४/१६ दिनांक ०६-०२-२०१६ सुशिक्षीत बेरोजगार अभियंता व मजुर सहकारी संस्था यांना रू. ०३.०० लक्ष पेक्षा अधिक किमतीच्या खुल्या ई-निवीदा प्रक्रीयेद्वारे कामे घेताना त्यांना कोणत्याही सवलती लागु राहणार नाहीत.

१४) मंजुर निवीदेतील सुरू केलेले प्रथम काम पुर्ण झाल्यानंतरच द्वितीय कामाचे कार्यारंभ आदेश दिले जातील.

१५) ज्या कंत्राटदाराने शासनाकडे काही रक्कम अनामत म्हणून जमा केली आहे. अश्या कंत्राटदारांना (EMD) भरण्यापासून सुट होती. परंतु दिनांक २४-०२-२०१६ च्या शासननिर्णानुसार EMD भरण्यापासुन असलेली सुट रद्द करण्यात येत आहे. त्यामुळे प्रत्येक कंत्राटदाराला EMD भरणे अनिवार्य राहील.

१६) मजुर सह संस्था व सुशिक्षीत बेरोजगार अभियंता यांना त्यांच्या कोटयाच्या मर्यादेतच कामे घेता येतील तसेच निविदा प्रकीयेमध्ये भाग घेण्या-या मजुर सह संस्था व सुशिक्षीत बेरोजगार अभियंता यांच्यासाठी त्यांना ठरवुन दिलेल्या कोटाच्या मर्यादेत आज पर्यंत केलेले काम या बाबतचे प्रतिज्ञा पत्र ५०० रू च्या बॉंडवर नोटरी करून देणे बंधनकारक राहील.

१७) ई-निवीदा भरतांना मजुर सहकारी संस्थांना **जिल्हा काम वाटप समिती, बीड** यांचे मार्फत मिळालेल्या कामांचे प्रमाणपत्र अपलोड करणे बंधनकारक राहील.

१८) निविदा प्रकीयेत भाग घेणा-या कंत्राटदारांना मागील ३ वर्षाचे आयकर विवरण पत्र सोबत जोडणे बंधनकारक राहील, तसेच पॅन कार्डची सत्यप्रत जोडणे बंधनकारक राहील.

१९) कृषि आयुक्तालय, पुणे यांचे ई-निवीदा परिपत्रक क्र. १२६०१ दिनांक ०६/०४/२०२३ नुसार निवीदा प्रक्रीयेत भाग घेणाऱ्या कंत्राटदारांना व्यवसायकर (Professional Tax) गत आर्थिक वर्षाचे (मागील वर्षा अखेरचे) भरणा केल्याचे प्रमाणपत्र (Clearance Certificate) अपलोड करणे आवश्यक आहे.

२०) मंजुर कामाची आखणी (ख्रुंट-दृद्दय) करून त्यास संबंधीत सहाय्यक कृषी अधिकारी यांची मान्यता घेऊनच काम त्यांच्या मार्गदर्शनाखाली व वरिष्ठ अधिकारी यांनी कामाचे भेटीत दिलेल्या सुचनांचे अनुपालन करणे बंधनकारक राहील.

२१) काम सुरू करण्यापुर्वीचे,काम करत असतांना व काम पुर्ण झाल्यानंतर अश्या विविध टप्प्यातील छायाचित्रे (Photographs) संबंधीत क्षेत्रीय कर्मचारी /अधिकारी यांच्या समवेत सादर करणे कंत्राटदारास बंधनकारक राहील (कामाचे विविध टप्प्यातील फोटो स्थळ निश्चीत होईल अशा रचनेत असावेत.)

२२) उपठेकेदार कामासाठी मान्य केले जाणार नाहीत तसे निदर्शनास आल्यास त्या स्थितीत काम रद्द केले जाईल व या कामाचा कोणताही आर्थिक मोबदला दिला जाणार नाही.

**२३) ठेकेदारांनी अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराच्या निवीदा भरतांना सुरक्षाठेव (Performance Security Deposit) बाबत सार्वजनीक बांधकाम विभाग ,शासन परिपत्रक क्र.सिएटी/२०१७/प्र.क्र.८/इमा-२/दिनांक २६/११/२०१८ नुसार बॅंकेची प्रतिपुर्ती हमी/डीडी बाबत कार्यवाही करावी.**

२४) सदरील निवीदा **दिनांक २५ /०५/२०२६** रोजी सकाळी ११:०० वाजता (शक्य झाल्यास ) उघडण्यात येईल.

२५) निविदा प्रसिद्धी पासून ते निविदा अंतीम होण्याच्या प्रक्रीयेदरम्यान निघणारी शासनाची परिपत्रके आणि शासननिर्णय कंत्राटदारास बंधनकारक राहतील.

२६) बांधकाम विभाग शासननिर्णय क्र. सिएटी-०१/२०१५/प्र.क्र.२०/ईमा-२ दि. २४.०४.२०१५ व संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, कृषि आयुक्तालय, पुणे यांचे पत्र क्र. ८५६७ दि. २८.०२.२०२० नुसार या जाहीरातीमधील मजुर सहकारी संस्था व सुशिक्षीत बेरोजगार अभियंता यांच्याकरीता असलेल्या निविदा भरण्यास फक्त बीड जिल्हयातील मजुर सहकारी संस्था व सार्वजनीक बांधकाम विभाग, बीड यांच्याकडे नोंदणीकृत असलेले सुशिक्षीत बेरोजगार अभियंता पात्र असतील.

२७) मजुर सहकारी संस्था व सुशिक्षीत बेरोजगार अभियंता यांना त्यांच्या कोट्याच्या मर्यादेतच कामे घेता येतील.

Scanned with OKEN Scanner

२८) दिनांक १४/१०/२०१५ च्या कृषि आयुक्तालय, पुणे यांचे परिपत्रकानुसार बांधबंदिस्ती (Compartment Bunding) कामाची तपासणी करतांना बांधाचे परिमाण २५ टक्के अधिक भरले पाहिजे. तसेच सविस्तर अंदाजपत्रकातील दर हे संस्करणासह असल्याने बाजु बांध व मुख्य बांधाचे संस्करण मजुरांमार्फत काम चालु असताना पुर्ण करावे लागेल. संस्करण न केल्यास प्रती घनमिटर विहीत दराने रक्कम बिलातुन वजा केली जाईल.

२९) महाराष्ट्र राज्यामध्ये दिनांक ०१-०७-२०१७ पासून **वस्तु व सेवा कर (जी.एस.टी.)** लागु करण्यात आलेला आहे. त्यामुळे जी.एस.टी. नोंदणी प्रमाणपत्र आणि गत आर्थिक वर्षाचे (मागील वर्षाअखेरचे ) **Clearance Certificate** आवश्यक असून अपलोड करावे लागेल तसेच शासनाने वेळोवेळी निर्गमीत केलेल्या शासननिर्णयाप्रमाणे कंत्राटदारांना मृद व जल संधारण कामासाठी वस्तु व सेवा कर भरावा लागणार आहे. कंत्राटदारांनी शासननिर्णयाप्रमाणे जी.एस.टी. कराच्या बोजाच्या विचार करूनच संकेतस्थळावरून निवीदा सादर कराव्यात.

३०) **सार्वजनिक बांधकाम विभाग, शासननिर्णय क्र.सिएटी/२०१८/प्र.क्र.११७/इमा-२/दिनांक २८/११/२०१८ नुसार यापुढे ई-निवीदे सोबत जोडलेली (अपलोड केलेली ) सर्व कागदपत्रे खरी असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र रू.५००/- रूपये च्या स्टॅम्प पेपरवर लिफाफा क्र.१ मध्ये सादर करणे कंत्राटदारास बंधनकारक करण्यात येत आहे.**

३१) निवीदेमध्ये नमुद केलेली कामे ही जलयुक्त शिवार अभियान २.० अंतर्गत प्रस्तावीत केलेली आहेत. निधीचे उपलब्धतेनुसार पुर्ण झालेल्या कामांची देयके अदा करण्यात येईल. निधी विलंबाबाबत कोणत्याही प्रकारचा दावा ग्राह्य धरला जाणार नाही.

३२) वरील कामांना दरवाढ लागु असणार नाही.

३३) ई निविदा भरताना मजुर सहकारी संस्थाना प्रत्येक कामासाठी जिल्हा मजुर सहकारी संघाचा ना- हारकत दाखला अनिवार्य आहे.

**उपविभागीय कृषि अधिकारी**
**बीड**

Signature Not Verified
Digitally signed by Sandip Yashvant Waghule
Date: 2026.05.11 16:43:48 IST
Location: Maharashtra-MH

Scanned with OKEN Scanner